॥ श्री ॥

# शिवताण्डवस्तोत्रम् - मराठी अनुवाद

श्री० प्रणव गोखले.

जयाचिया जटावनी जलौघ पूत ओघळे
गळासरी जया विशाळ व्याळमालिका रुळे ।
डमड्डमध्वनीस मड्डुवादने भयंकर
करीत तांडवास शंभु तो असो शुभंकर ॥१॥

© www.madhaveeraghuveer.com

३० जून २०२०



॥श्री॥

# शिवताण्डवस्तोत्रम्

जटाटवीगलज्जलप्रवाहपावितस्थले
गलेऽवलम्ब्य लम्बितां भुजंगतुंगमालिकाम् ।
डमड्डमड्डमड्डमन्निनादवड्डमर्वयं
चकार चण्डताण्डवं तनोतु नः शिवः शिवम् ॥१॥

जटाजूटांच्या जंगलामधून निघालेली गंगा तिच्या प्रवाहाने पवित्र करते अशा गळ्यामध्ये मोठमोठ्या सर्पांच्या माळा लटकवून डमरूने डम डम अशा शब्दांनी युक्त प्रचंड ध्वनि करत तांडव नृत्य करणारा शिवशंकर आमचे कल्याण करो. शिवः शिवं तनोतु ।

अटवी - अरण्य, कानन, पावित - पवित्र

जटाकटाहसम्भ्रमभ्रमन्निलिम्पनिर्झरी
विलोलवीचिवल्लरीविराजमानमूर्धनि ।
धगद्धगद्धगज्ज्वलल्ललाटपट्टपावके
किशोरचन्द्रशेखरे रतिः प्रतिक्षणं मम ॥

जटाजूटांमधून त्याच्या भव्य अशा (कढईप्रमाणे) भालप्रदेशावर विहार करणाऱ्या गंगेच्या लहरींमुळे त्याचे मस्तक शोभून दिसत आहे. आणि त्याच वेळी त्याच्या कपाळ पट्टीवर अग्नि (तिसरा डोळा) धगधगत आहे. आणि मूर्धेवर बाल (किशोर) चंद्रमा शोभून दिसत आहे अशा भगवान शंकराविषयी माझ्या मनात प्रतिक्षणी अनुराग भक्तिभाव असू दे.

धराधरेन्द्रनन्दिनीविलासबन्धुबन्धुर
स्फुरद्दिगन्तसन्ततिप्रमोदमानमानसे ।
कृपाकटाक्षधोरणीनिरुद्धदुर्धरापदि
क्वचिद्दिगम्बरे मनोविनोदमेतु वस्तुनि ॥

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 |
| 29 | 30 | 31 | | | | |
| M | T | W | T | F | S | S |

DECEMBER '14

DECEMBER

© www.madhavbedaghuveer.com

ज्या शिरी जटागिरीवरी नभस्तरंगिणी।
लते समान शोभते करी खळाळ रिंगणी।
झळाळ ज्वाळ भालपट्टिकेवरी धडाडतो
जडो सदैव मन्मनास छंद चंद्रचूड तो॥३॥

पर्वतराज हिमालयाची कन्या असणाऱ्या पार्वतीने विलासामध्ये मग्न असताना टाकलेल्या नेत्रकटाक्षांमुळे ज्याचे मन आनंदित झाले आहे. भक्तांच्या आपत्काळी जो कृपाकटाक्षाद्वारेच संकट दूर करतो अशा चिदाकाशरूप परमवस्तु (तत्त्व रूप) शिवाच्या ठायी माझे मन रमून जावो.

जटाभुजंगपिंगलस्फुरत्फणामणिप्रभा
कदम्बकुंकुमद्रवप्रलिप्तदिग्वधूमुखे।
मदान्धसिन्धुरस्फुरत्त्वगुत्तरीयमेदुरे
मनोविनोद

जटात ज्या फणींद्र मौळी माणिक प्रभा भ्रमे
गमे जणू दिशावधू ललाटलेप कुंकुमे।
विशालमत्त हस्तिचर्म लेत उत्तरीयसे
असो मनास ठाव भूतनाथ तोच सौरसे॥४॥

ज्याच्या जटांमधील नागांच्या फण्यावरील लालसर मण्यांचे प्रभावलय हे दिशारूपी वधूच्या कपाळी रेखलेल्या कुंकवाच्या टिळ्याप्रमाणे शोभून दिसत आहे. मदांध हत्तीचे चर्म पांघरल्याने जो अधिकच भव्य भासतो आहे अशा भूतपति शिवाच्या ठायी माझे मन रमून अधिक आनंद प्राप्त करो.

सहस्रलोचनप्रभृत्यशेषलेखशेखर
प्रसूनधूलिधोरणीविधूसराङ्घ्रिपीठभूः।
भुजंगराजमालया निबद्धजाटजूटकः
श्रियं चिराय जायतां चकोरबन्धुशेखरः।

OCTOBER '14

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | |

© www.madhaveeraghuveer.com

समस्तदेवमौलिचे सुदिव्य ती सुमावलि
परागधूलि हो जया पदांजली विसावली।
भुजंगराज आवळोनि माळि जो जटांवरी।
अखंड वैभवार्थ तो असो शशांकशेखर॥५॥

सहस्राक्ष इंद्र आदि सर्व देवगणांच्या मस्तकावरील दिव्य फुलांतील पराग (हे देव जेव्हा नमस्कारासाठी आपले मस्तक पायांवर टेकवतात तेव्हा) धुळीसारखे होऊन ज्याच्या पादपीठाला धूसर करतात, ज्याने आपल्या जटाजूटांना नागराजाच्या माळेने आवळले आहे. (चकोराचा प्रिय बंधु) अशा चंद्राला आपल्या शिरोभागी धारण करणारा शिव आम्हाला चिरकालिन टिकणारी संपत्ति प्रदान करो.

ललाटचत्वरज्वलद्धनंजयस्फुलिंगभा
निपीतपंचसायकं नमन्निलिम्पनायकम्।
सुधामयूखलेखया विराजमानशेखरं
महाकपालिसम्पदे शिरो जटालमस्तु नः॥६॥

स्फुलिंगदीप्त ज्या कपालवेदिकेतुनी निघे
गिळीत मन्मथा, जया पदी सुरेंद्र वाकणे
जटाकिरीट साजिरा शिरी जया सुधाकर
आम्हा महाकपालि तो असो सुसंपदाकर॥६॥

ज्याच्या कपाळरुपी वेदीवर पेटलेल्या अग्निच्या केवळ ठिणगीच्याच तेजाने पंच बाण धारण करणाऱ्या कामदेवाला गिळंकृत केले, देवांचा राजा देखील ज्याला नमस्कार करतो, ज्याच्या मस्तकावर चंद्रकोर विराजमान आहे ब्रह्मदेवाच्या पाचव्या मुखाला छेदून त्याचे महाकपाल धारण करणारा, जटामंडित मस्तक असणारा असा शिव आम्हाला संपत्ति प्रदान करणारा असो.



© www.madhaviraghuveer.com

ज्या कराळ भालदेशी वळिवळे लोटती
स्फुलिंग त्या विशाळ कामदेव होत आहुति।



करालभालपट्टिका धगद्धगद्धगज्ज्वलद्
धनंजयाहुतिकृत प्रचंड पंचसायके।
धराधरेंद्रनंदिनी कुचाग्रचित्रपत्रक
प्रकल्पनैकशिल्पिनि त्रिलोचने रतिर्मम॥७॥

ज्याच्या विक्राळ दिसणाऱ्या, धगधगून पेटणाऱ्या भाळावरील अग्नीमध्ये (उन्मादन, तापन, शोषण, स्तंभन, संमोहन) या भयंकर पाच बाण धारण करणाऱ्या कामदेवाचीच आहुती पडली. प्रणयकाळी पर्वतराजकन्येच्या पार्वतीच्या वक्षस्थळावर नक्षी काढणारा अद्वितीय शिल्पकार शिवावर माझे प्रेम जडावे.

ज्याच्या विक्राळ दिसणाऱ्या धगधगून पेटणाऱ्या भाळावरील अग्नीमध्ये (उन्मादन, तापन, शोषण, स्तंभन, संमोहन) या पाच भयंकर बाण धारण करणाऱ्या कामदेवाचीच आहुती पडली, प्रणयकाळी पर्वतराजकन्या पार्वतीच्या वक्षस्थळावर नक्षी काढणाऱ्या, अद्वितीय शिल्पकार अशा तीन नेत्र धारण करणाऱ्या शिवावर माझे प्रेम जडावे (आहे)

नवीनमेघमण्डली निरुद्धदुर्धरस्फुरद्
कुहूनिशीथिनीतमः प्रबन्धबद्धकन्धरः।
निलिम्पनिर्झरीधरस्तनोतु कृत्तिसिन्धुरः
कलानिधानबन्धुरः श्रियं जगद्धुरन्धरः॥८॥

जयाची कंठकांति नवीन मेघ दाटता नभा
निशा अमावरी रवींदुसंगमा समा समप्रभा।
गजाजिनास पांघरी सुरापगाशशीधर
प्रवर्तवो श्रिये स्वयेचि तो जगद् धुरंधर॥८॥

ज्याच्या कंठाची कांति ही नुकत्याच दाटून आलेल्या मेघांनी झाकोळलेल्या अमावस्येच्या मध्यरात्री पसरलेल्या अंधाराप्रमाणे आहे. देवनदी गंगेला धारण करणारा, गजचर्माचे वस्त्र धारण करणारा, कलानिधान अशा चंद्रामुळे सुंदर दिसणारा, जगाचा आधारस्तंभ असा तो आमच्या श्रीची (ऐश्वर्याची) वृद्धी करो.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 | OCTOBER '14 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | |
| S | M | T | W | T | F | S | |

©www.madhavraghuveer.com

चितारी चित्र नासिये गिरीन्द्रजा भुजांतरी
जडो रती मती मदीय त्या त्रिलोचनावरी ॥८॥



प्रफुल्लनीलपङ्कजप्रपञ्चकालिमप्रभा।
गलाम्बिकण्ठकन्दलिरुचिप्रबद्धकन्धरम्।
स्मरच्छिदं पुरच्छिदं भवच्छिदं मखच्छिदं
गजच्छिदान्धकच्छिदं तमन्तकच्छिदं भजे ॥९॥

प्रफुल्लनील पंकजावलि समान नीलिमा
जया गळ्यात गौर कंधरी दिसे मनोरमा।
स्मरा पुरास जाळतो प्रपंच यज्ञ ने लया
गजारि अंधकारि तो यमारि मी भजे तया॥९॥

फुललेल्या निळ्या कमळांच्या राशीप्रमाणे कांती असणाऱ्या कंठाची शोभा ज्याच्या गौर खांद्यावर शोभून दिसते. जो कामदेव त्रिपुराचा, भवाचा (संसाराचा) मख म्हणजे (प्रजापतीने केलेल्या) यज्ञाचा, गजासुराचा, अंधकासुराचा आणि साक्षात मृत्युदेवतेचा नाश करतो, अशा शिवाला मी भजतो.

अगर्वसर्वमङ्गलाकलाकदम्बमञ्जरी
रसप्रवाहमाधुरीविजृम्भणामधुव्रतम्।
स्मरान्तकं पुरान्तकं भवान्तकं मखान्तकम्
गजान्तकान्धकान्तकं तमन्तकान्तकं भजे ॥१०॥

अगर्विता शिवा तिच्या कलाकदंब मोहरे
विलुब्ध माधुरीस त्या मिलिंदरूप जो वरे।
स्मरा पुरा भवा मखा गजा हि अंधकाप्रती
भजेन काळकाळ तो यमांसि देत सद्गती॥१०॥

गर्वरहित अशा पार्वतीच्या कलाविलास कदंबवृक्षाप्रमाणे मोहरला असता, जो त्या मंजिऱ्यांची गोडी चाखणारा मधुकर होतो. कामदेव, त्रिपुर, संसार, यज्ञ, गजासुर, अंधकासुर, यम या सर्वांचाही अंत करणारा जो शिव त्याला मी भजतो.

DECEMBER '14

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 |
| 29 | 30 | 31 | | | | |
| M | T | W | T | F | S | S |

© www.madhaveeraghuveer.com

जयोऽसुत्यास ज्यामिया गळ्यात व्याळ खेळती
उसास टाकती कृपालि ज्वाळ ते उफाळती।
करी मिमि मिमि मंद दुन्दुभी मृदंगनाद मंगला।
शिव स्वतःचे ज्या प्रचंड तांडवात रंगला॥११॥

अखर्वसर्वमङ्गलाकलाकदम्बमञ्जरी
रसप्रवाहमाधुरी विजृम्भणामधुव्रतम्।
स्मरान्तकं पुरान्तकं भवान्तकं मखान्तकं
गजान्तकान्धकान्तकं तमन्तकान्तकं भजे॥१०॥

जयत्वदभ्रविभ्रमद्भुजंगमश्वसन्
विनिर्गमत्क्रमस्फुरत्करालभालहव्यवाट्
धिमिद्धिमिद्ध्वनन्मृदंगतुंगमंगल ~~ध्वनि~~
ध्वनिक्रमप्रवर्तितप्रचण्डताण्डवः शिवः॥११॥

ज्याच्या कपाळावरील अग्नी हा त्याच्या गळ्यात (अंगावर) संचार करणाऱ्या नागांच्या श्वासांनी फुत्कारांनी अधिकच भडकून उठत आहे. जो धिमिध धिमिधे असे ताल बोल उत्पन्न करणाऱ्या मृदंगाच्या, उत्तुंग जाणाऱ्या मंगलाचरण। नांदी सूचक अशा नादानुक्रमाने भव्यदिव्य तांडव करता झाला अशा शिवाचा विजय असो.

दृषद्विचित्रतल्पयोर्भुजङ्गमौक्तिकस्रजोर्
गरिष्ठरत्नलोष्ठयोः सुहृद्विपक्षपक्षयोः।
तृणारविन्दचक्षुषोः प्रजामहीमहेन्द्रयोः
समं प्रवर्तयन्मनः कदा सदाशिवं भजे॥१२॥

समे शिळा पलंग की भुजंग माळ मौक्तिका
महर्घ रत्न मृत्तिका समान शत्रु वा सखा।
तृणासि सुंदरीसमान मानि रंक राव वा
राहतो असा कधी भजेन मी सदाशिवा॥१२॥

पाषाण किंवा घानशी शय्या; सर्प किंवा मोत्यांची माळ, बहुमूल्य रत्न किंवा मातीचे ढेकूळ, मित्र अथवा शत्रु, गवताचे पाते किंवा कमललोचना स्त्री, प्रजा वा राजा, या सर्वाठायी समबुद्धीने व्यवहार करणाऱ्या मला सदाशिवाची (परम) भक्ती केव्हा बरे प्राप्त होईल?

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | |

OCTOBER '14

© www.madhuveer.com

कदा निलिम्पनिर्झरीनिकुञ्जकोटरे वसन्
विमुक्तदुर्मतिः सदा शिरःस्थमञ्जलिं वहन्।
विलोललोललोचनो ललामभाललग्नकः
शिवेति मंत्रमुच्चरन् कदा सुखी भवाम्यहम्॥१३॥

वसोनि जाह्नवीतिरी गुहेत मूढ काननी
कुबुद्धि सोडुनी शिरोणिये करास जोडुनि।
त्यजोनि नेत्रविभ्रमा त्रिपुंड्र भाळी लेवुनी
कधी जपेन शंभुनाम पूर्ण मी सुखावुनी॥१३॥

देवनदी गंगेच्या काठी वनातील एखाद्या गुहेत राहून दुर्बुद्धीचा त्याग केलेला, सदैव मस्तकावर हात जोडून नम्र असणारा, डोळ्यांची चंचलता सोडून एकाग्रदृष्टी झालेला, भाळावर त्रिपुंड्र भस्म/तिलक धारण करणारा असा मी शिवमंत्राचा जप करत त्या परमसुखाला कधी बरे प्राप्त होईन?

इमं हि नित्यमेवमुक्तमुत्तमोत्तमं स्तवं
पठन् स्मरन् ब्रुवन्नरो विशुद्धिमेति सन्ततम्।
हरे गुरौ सुभक्तिमाशु याति नान्यथा गतिं
विमोहनं हि देहिनां सुशंकरस्य चिन्तनम्॥१४॥

अखंड नित्य जो म्हणे महोत्तमस्तवास या
पठे स्मरे नरास आत्मशुद्धि लाभते तया।
अनन्य शंभु सद्गुरू पदी सुभक्ति सद्गति
करीत मोहमुक्त देहधारका शिवस्मृति॥

© www.madhaveeraghuveer.com

DECEMBER '14

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 |
| 29 | 30 | 31 | | | | |

DECEMBER

पूजावसानसमये दशवक्त्रगीतं
यः शम्भुपूजनपरं पठति प्रदोषे।
तस्य स्थिरां रथगजेन्द्रतुरङ्गयुक्तां
लक्ष्मी सदैव सुमुखि प्रददाति शम्भुः॥१५॥

जे स्तोत्र हे दशमुखे रचिले शिवाचे
शंभूस अर्चुनि निशामुखि गाती वाचे।
संपत्ति हस्तिरथवाजियुता तयांस
देईल सुस्थिर सदा सुमुखी महेश॥१५॥

शिवाची वाङ्मयी पूजा असणारे दशानन रावणाने गायलेले हे स्तोत्र जो प्रदोषकाळी (त्रयोदशी (तिन्हीसांजा)) शिवपूजन करून शेवटी म्हणेल त्याला शिव शंभु आपल्या वरप्रसादाने रथ, हत्ती, घोडे इत्यादींनी युक्त स्थिर आणि सुमुखी अशी लक्ष्मी (संपत्ति) प्रदान करील.

© www.madhaveeraghuveer.com

OCTOBER '14

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | |